AURA - AN INTERNATIONAL BI-ANNUAL MULTIDISCIPLINARY E-RESEARCH JOURNAL

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

==========================================================================

# ऐतिहासिक वारसा स्थळ :- रायगड किल्ला

**प्रा. सुनिता विनायक खोब्रागडे**
**पीएच.डी स्कॉलर्स**
sunitashingade11@gmail.com.
**प्रा. डॉ. प्रज्ञा भा. कामडी**
**नगर परिषद शिवाजी महाविद्यालय,**
**मोवाड ता. नरखेड जि. नागपूर**
**prtkamdi47@gmail.com**
**Mob. 9422144203**

==========================================================================

**सारांश :-**

**रायगड किल्ला :-**

रायगड किल्ला हा महाराष्ट्रातील एक प्रसिध्द ऐतिहासिक किल्ला नसून तो मराठा साम्राज्याच्या गौरवशाली इतिहास प्रशासन आणि स्वराज्यांचे स्वप्न आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी या गडाला आपल्या राजधानीच्या दर्जा दिला आणि येथूनच स्वराज्याचा कारभार चालवला इ.स. 1974 मध्ये येथूनच महाराजाचा राज्यभिषेक झाला. ज्यामुळे या गडाला अनमोल ऐतिहासिक महत्व प्राप्त झाले या गडावर राजेशाही इमारती बाजारपेठा, पाण्याचे टाकी आणि ऐतिहासिक वास्तू आहेत. जे आजही मराठा सम्राज्याची आठवण करुन देतात आणि त्यांच्या इतिहास अनुभव शकतात. रायगड किल्लाला पूर्वी रायरी म्हणून ओळखले जात असे या ठिकाणी राजदरबार हिरकणी, बुरूज, टकमकटोक, आणि महाराजांची समाधी या सारखी प्रमुख आकर्षणे आहे. आज पर्यटक रोपवेने सहजपणे गडावर जाऊ शकतात. शिवाजी महाराजांनी 1956 मध्ये हा किल्ला जिंकला आणि त्यांचे नाव रायगड ठेवले या राजगडाला गडाचा राजा म्हणतात, कारण तो उंच दुर्गम आणि सामाजिक दृष्टया महत्वाचा आहे. जो सह्याद्रीच्या रांगेत बसलेला आहे. छत्रपती शिवाजी महारारांची ती पहिली राजधानी होती. तिथे त्यांनी राज्याची सुत्रे हलविले मोहिमा आखल्या आणि राज्याचा खजिना ठेवला. त्यामुळे त्यांचे ऐतिहासिक आणि प्रशासकीय महत्व खुप मोठे आहे. राजगड किल्ला हा केवळ किल्ला नसून स्वराज्याचा प्रतीक आहे.

**उदिष्टे :-**

- रायगड किल्ल्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी तपासणे.
- रायगड किल्ल्याचे भौगोलिक रचनाचा आढावा घेणे.
- रायगड किल्ल्याचे लष्करी व राजकिय महत्वाचा आढावा घेणे.
- रायगड किल्ल्याचे स्थापत्य केलेचा आढावा घेणे.
- रायगड किल्ल्याचे वारसा स्थळाचे जतन संरक्षणामध्ये शासनाचे योगदान अभ्यासणे.
- रायगड किल्ल्याचे पर्यावरण आणि पर्यटन दृष्टीकोनाचा अभ्यास करणे.
- रायगड किल्ल्याचे शैक्षणिक महत्व अभ्यासणे.
- रायगड इतर आकर्षणे यांचा आढावा घेणे.

## ❖ प्रस्तावना :-

महाराष्ट्राच्या सह्याद्री पर्वत रांगामध्ये वसलेला रायगड किल्ला हा मराठा साम्राज्याचा गौरवशाली इतिहास सांगणारा महत्वपूर्ण किल्ला आहे. छत्रपती शिवाजी महारांजानी रायगडला आपल्या स्वराज्याची राजधानी म्हणुन निवड करुन इथे 1674 साली राज्यभिषेक केला व नैसर्गीक संरक्षण भक्कम तटबंदी आणि नियोजनबद्ध रचना यामुळे रायगड किल्ला सामाजिक राजकिय सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचा ठरला. स्वराज्याचा स्वप्नाची पुर्तता न्यायप्रिय शासन आणि स्वतंत्र्याची प्रेरणा यांचे प्रतीक म्हणून रायगड किल्ला आजही इतिहास प्रेमीसाठी उपयुक्त प्रेरणास्थन आहे. रायगड किल्याचे मुळ नाव रायरी होते 1956 साली छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किंल्ला ताब्यात घेतला व किल्याची डागडुजी व मजबुतीकरण करुन 1674 मध्ये महाराजांनी राज्यभिषेक गडावर केला. आणि रायगड स्वराज्याची राजधानी बनवली. रायगड किल्यावर उत्कृष्ट स्थापत्यकला आहे. महादरवाजा, वाघदरवाजा जगदिश्वर मंदिर, गंगासागर तलाव, हत्तीतलाव, व राजसदर, राणीवसा, हिरकणी बुज, असे स्थापत्यकलेचे उदाहरण पाहवयाला मिळतात. तसेच रागडावरुन स्वराज्याचा कारभार चालवला जात असे. या ठिकाणावरुन न्याय, महसूल व लष्करी व्यवस्थेचे काम सुव्यवस्थीतपणे चालत असे. किल्यावर शिस्त व सुरक्षीतता यांना विशेष महत्व होते. रायगड किल्ला खुप उंच आहे. आणि त्याच्या तटबंदीमुळे तो अभदेय आहे. कोणत्याही बाजूने हल्ला करणे कठीण होते म्हणून तो इतर किल्यापेक्षा श्रेष्ठ मानला जातो. हा किल्ला सह्याद्रीच्या रांगत असल्याने त्याला वेळा घालणे सोपे नव्हते. त्याच्या आजुबाजूच्या नद्या आणि टेकडया असल्याने त्याला नैसर्गीक संरक्षण मिळत होते. छ. शिवाजी महारांजानी सुमारे सोळा वर्ष राजगडाला स्वराज्याची राजधानी म्हणून वापरले,

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

त्यानंतर रायगड राजधानी बनविले. तसेच शिवाजी महाराजांचा पुत्र राजाराम पहिला यांचा जन्म आणि पत्नी सईबाई यांचे निधन गडावर झाले. रायगडाच्या पायथ्याशी पाचाड येथे राजमाता जिजाबाई यांची समाधी आहे. आज रायगड किल्ला महाराष्ट्राचा प्रतीक आहे. तो प्रत्येक भारतीयांच्या मनात स्वातंत्र्य देशप्रेम व त्यागाची भावना जागवतो म्हणूनच रायगड किला हा इतिहासांचा अभ्यास करण्यासाठी राष्ट्रप्रेरणा घेण्यासाठी व सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी अत्यंत महत्वाचा ठरतो.

## ❖ ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

रायगड किल्ला महाराष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत महत्वाचा किल्ला आहे. सह्याद्री पर्वत रांगामध्ये सध्याच्या रायगड जिल्ह्यात हा किल्ला आहे. प्राचीन काळात रायगड किल्याचे नाव रायरी असे होते हा किल्ला सुरुवातील निजामाच्या ताब्यात होता. नतर इ.स. 1956 मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी हा किल्ला जिंकून घेतला, या किल्याची  भौगोलिक संरचना उंची आणि नैसर्गिक संरक्षण लक्षात घेवून शिवाजी महाराजानी यांचे नाव बदलवुन रायगड ठेवले. आणि इ.स.1674 मध्ये रायगड किल्यावर शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक झाला. आणी रायगड ही मराठा साम्राज्याची राजधानी बनली.आणि इथुनच स्वराज्यांचे प्रशासन चालविले जात होते. रायगड किल्यावर राजदरबार राणीवसा, बाजारपेठ, पाण्याची उत्कृष्ट व्यवस्था तसेच मजबुत तटबंदी आढळते. यामुळे रायगड हा केवळ लष्करी नव्हे तर प्रशसकिय दृष्ट्या ही अत्यंत महत्वाचा किल्ला आहे.

## ❖ भौगोलिक पार्श्वभूमी :-

रायगड किल्ला हा महाराष्ट्राच्या रायगड जिल्ह्यात सह्यांद्री पर्वत रांगात असून समुद्र सपाटीपासून सुमारे 27000 फुट उंचीवर व सभोवतालचा प्रदेश डोगराळ दऱ्याखोल्यानी घनदाट जंगलांनी आच्छादलेला आहे. रायगड किल्ला एका उंच टेहळीस उपयुक्त अशा डोंगर माथ्यावर बांधलेलाअसून त्याला नैसर्गिक संरक्षण लाभलेले आहे. किल्याच्या बाजूने खोल दऱ्या असल्यामुळे शत्रूसाठी किल्यावर हल्ला करणे अत्यंत कठीण होते. यामुळे किल्याचा अभेद किल्ला मानला जातो. या किल्यावर तलाव, टाकी व पाण्याची उत्तम व्यवस्था दिसून येते. रायगड किल्याच्या आसपासच्या परिसरातून कोकण व देशावर लक्षात ठेवता येत असल्याने तो रणनितीदृष्टया अत्यंत महत्वाचा आहे. उंच डोंगर, खोल दऱ्या, घनदाट जंगले आणि नैसर्गिक जलस्रोत यामुळे रायगड किल्याची भौगोतिक रचना अत्यंत मजबूत व संरक्षणात्मक आहे.

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

## ❖ रायगड किल्याचा स्थापत्य कलेचा आढावा :-

रायगड किल्याची स्थापत्य कला ही मध्ययुगीन मराठा स्थापत्य शैलीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ला जिंकल्यानंतर त्याचे पुर्नरचणा विकास केला हा किल्ला नैसर्गिक डोंगर रचनेचा उपयोग करुन बांधलेला आहे. तसेच मजबूती तटबंदी, उंच बुरुज, आणि अरुंद प्रवेश मार्ग ही संरक्षणात्मक रचना आहे, आणि दगड चुना वापरुन बांधकाम अनावश्यक अलंकार टाळून उपयुक्तता व टिकाऊ पणा यांना प्राधान्य या किल्यामध्ये प्रमुख वास्तू आहे.

प्रशासन सभासांठी राजसदर आहे. राज परिवारासाठी स्वतंत्र सुरक्षीत व्यवस्था आणि त्यासाठी राणीवसा आहे. तसेच दैनंदिन गरजा भागविण्यासाठी बाजारपेठा आहेत. पाऊसाचे पाणी साठविण्यासाठी पाण्याच्या टाक्या व तलाव आहे.  तसेच संरक्षणासाठी शत्रूला अडविण्यासाठी महादरवाजा व इतर दरवाजे आहेत. लष्करी प्रशासकीय गरजानुसार बांधकाम साधेपणा मजबुती आणि कार्यक्षमता यांचा संगम रायगड किल्याची स्थापत्यकला ही स्वराज्यांच्या संरक्षण प्रशासन आणि शिस्तबध्द नियोजनाची साक्ष देते. ती छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुरदृष्टी व स्थापत्य समजुतीचे प्रतिबींब आहे.

## ❖ रायगड किल्याचा पर्यावरण व पर्यटन दृष्टीकोन :-

रायगड किल्ला हा सह्याद्री पर्वत रांगामध्ये असून तो परिसर घनदाट जंगलांनी जैवविविधतेने समृध्द आहे. या किल्या भोवती विविध औषधी वनस्पती झाडे, पक्षी, प्राणी आढळतात. तसेच नैर्गिक जलस्रोत, तलाव व पाण्याच्या टाक्या आजही अस्तित्वात आहेत. वाढत्या पर्यटनामुळे कचरा, प्लास्टीक प्रदूषण व वनस्पतीचे नुकसान होण्याचा धोका आहे. त्यामुळे पर्यावरण सरंक्षणासाठी स्वच्छता मोहीम, प्लास्टीक बंदी व जनजागृती आवश्यक आहे. रायगड किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांनी राजधानी असल्याने तो ऐतिहासिक व राजकिय दृष्टया पर्यटन स्थळ आहे. यामुळे हजारो देशी-विदेशी पर्यटन किल्यास भेट देतात. रोपवे, पायवाट, मार्गदर्शक, सेवा यामुळे पर्यटन सुलभ झाले आहे. त्यामुळे शिवराज्यभिषेक दिन इतिहास प्रेमी ट्रेकर्स, अभ्यासक यांची मोठी उपस्थिती असते, तसेच शाश्वत पर्यटन राबविल्यास स्थानिक रोजगार संस्कृती संवर्धन व अर्थव्यवस्था मजबुत होते. रायगड किल्याचा विकास करतांना पर्यटन आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे आवश्यक आहे. नैसर्गिक वारसा जपून जबाबदार पर्यटनाला प्रोत्साहन दिल्यास रायगड गडाचे ऐतिहासिक व पर्यावरणीय महत्व कायम राहील.

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

## ❖ रायगड किल्ल्याच्या वारसा स्थळाच्या जतनामध्ये शासनाचे योगदान :-

रायगड किल्ला हा राष्ट्रीय महत्वाचा ऐतिहासक वारसा म्हणून घोषीत करण्यात आला आहे. कारण किल्ल्याच्या जतन व संवर्धनाची जबाबदारी भारतीय पुरात्तव सर्वेक्षण विभाग आणि महाराष्ट्र शासन यांच्याकडे आहे. शासनामार्फत किल्ल्यावरील तटबंदी, दरवाजे राजवाड्याचे अवशेष पाण्याच्या टाक्या यांची दुरुस्ती यांची संरक्षण केले जाते. पर्यटकासाठी रोपवे पायवाट, सुधारणा माहिती फलक, मार्गदर्शक व्यवस्था उभारण्यात आली आहे, आणि किल्ल्याच्या परिसरात स्वच्छतामोहीम प्लास्टीक बंदी व पर्यावरण संरक्षण नियम राबविले जातात. शिवराज्यभिषेक दिन व इतर ऐतिहासिक कार्यक्रमांना शासनाच्या अधिकृत सहकार्य असते. स्थानिक लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी पर्यटन व रोजगार राबविले जातात.

## ❖ रायगड किल्ल्याला भेट कशी द्यावे:-

रायगड किल्ला महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यात महाड शहराजवळ आहे. समुद्र सपाटीपासून 2700 फुट उंचीवर हा किल्ला आहे. रायगडला जाण्याचा मार्ग रेल्वे मार्गाने जवळचे रेल्वेस्थानांक महाड वरुन एस.टी.बस खाजगी वाहनाने पाचाड गांव सुमारे 25 कि.मी. पाचाळ वरुन पायी चढाई किंवा रोपवे रस्ते मार्गाने जाण्यास झाल्यास मुंबई ते रायगड सुमारे 200 कि.मी व पूणे ते रायगड सुमारे 135 कि.मी. आहे. स्व:ताचे वाहन किंवा रोपचे बस स्टेशन पर्यंत जता येते. या किल्यावर चढण्याचे मार्ग, पायी मार्ग सुमारे 1400 ते 1500 पायऱ्या आहेत. चढाईसाठी 2 ते 3 तास लागतात. मार्गामध्ये वाघ दरवाजा व महादरवाजा या किल्यावर पाहण्यासारखी ठिकाणे राजसदर छत्रपती शिवाजी महाराजांनी समाधी, राणीवसा, जगदिश्वर मंदिर, गंगासागर तलाव, महादरवाजा, हत्तीतलाव आहे. तसेच भेट देण्याचा योग्य काळ ऑक्टोबर ते फेब्रुवारी महिना आहे तसेच जुन ते सप्तटेंबर मध्ये निसर्ग सुदंर दिसतो.

## ❖ रायगड किल्ल्याचे शैक्षणिक महत्व :-

रायगड किल्ला हा मराठा इतिहासांचा जीवंत अभ्यास आहे. हा किल्ला शिवाजी महाराजांची राजधानी होती. येथेच त्यांनी सन 1974 शिवराज्यभिषेक केला ज्यामुळे विद्यार्थ्यांना मराठा साम्राज्याचा इतिहास प्रत्यक्ष स्थळावर समजतो. तसेच या किल्यामधून प्रशासन व राज्य व्यवस्थेत अभ्यासासाठी उपयुक्त राजसदर अष्टप्रधान मंडळ, न्याय व्यवस्था, महसूल पध्दती याची माहिती मिळते. किल्ले स्थापत्य केले ज्ञान प्राप्त होते, जसे महादरवाजा, तटबंदी, बुरुज, जलव्यवस्थापन याद्वारे मध्ययुगीन

स्थापत्य व संरक्षण याची माहिती मिळते. या किल्यामधुन विद्यार्थ्यांना भूगोल विषयाच्या प्रत्यक्ष अभ्यास करण्यास मदत होते. डोगराळ, भूप्रदेश, उंची हवामान, नैसर्गिक संरक्षण यांचा अभ्यास रायगडावर करता येतो. या किल्यामधून जगदिश्वर मंदिर समाधी स्थळे, यामधून तात्कालीन धार्मीक, सांस्कृतिक जिवंत समजते. हा किल्ला शिवाजी महाराजांच्या शौर्य स्वराज्य स्वाभिमान यांचे प्रतिक आहे. यामुळे देशप्रेम नेतृत्व गूण, व जवाबदाऱ्याची भावना विकसीत होते. संशाधन व अभ्यासभेटीसाठी हा किल्ला विद्यार्थ्याना उपयुक्त आहे. इथे इतिहास पुरातत्व पर्यटन व्यवस्थापन यासाठी उपयुक्त असा किल्ला आहे. तसेच पर्यावरण शिक्षणाबद्दल माहिती येथून मिळते निसर्ग संवर्धन वारसा जतन शाश्वत पर्यटन यांचे धडे रायगड भेटीतून मिळतात म्हणून रायगड किल्ला ऐतिहासिक स्मारक नसून तो जिवंत शैक्षणिक प्रयोगशाळा आहे.

## ❖ रायगड किल्ला वरील इतर आकर्षणे :-

महादरवाजा हा रायगड कित्याचा मुख्य प्रवेशद्वार आहे. दोन उंच बुरुज आणि मजबूत बांधकामामुळे शत्रूला सहज प्रवेश अशक्य होतो. इथेच शत्रूवर बुरुज दगड, गरम तेल टाकण्याची व्यवस्था आहे. तसेच वाघ दरवाजा एक लपविलेला अरुंद व वळणदार प्रवेश मार्ग आहे. आपत्यकालीन परिस्थितीत वापरला जाणारा हा मार्ग रायगडच्या संरक्षण व्यवस्थेची बुध्दीमत्ता दर्शविते. जगदिश्वर मंदिर हे छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेले प्राचीन शिव मंदिर आहे. आजही येथे नेहमी पूजा होते. मंदिराशेजारी महाराजांचची समाधी आहे. गंगासागर तलाव हा राज्यभिषेकाच्या वेळी वापरण्यात आलेला हा तलाव रायगडावरील जल व्यस्थेच उत्कृष्ठ उदाहरण आहे. तसेच हत्तीतलाव हा हत्तीना पाणी पाजण्यासाठी बांधलेला मोठा तलाव आहे. किल्यावरील नियोजनबध्द जलसाठा दर्शविती. तसेच राजसदर हा राजकिय सभा निर्णय आणि प्रशासकिय कामकाजासाठी वापरले जाणारे ठिकण आहे. तो मराठा राज्य व्यवस्थेचा केंद्रबिंदू मानला जातो. राणीसाठी स्वातंत्र्य बांधलेला सुरक्षीत व सुसज्य वसाहतीचा भाग आहे. तात्कालीन राजघराणाच्या जीवनशैलीचा झलक येथे पाहाव्यास मिळते. टकमकटोक हा किल्याच्या पश्चिम टोकावरील उंचकळा राजद्रोह किंवा गंभीर गुन्हासाठी शिक्षा देण्याचे ठिकाण म्हणून ओळखले जाते. येथून दिणारा निसर्गदृष्ट्या अतिशय मनोहारी आहे. या किल्यावर बाजारपेठ अवशेष आहे. व्यापारी

ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com

दैनंदिन व्यवहारासाठी उपयुक्त असावी येथून आर्थिक जिवनांची माहिती मिळते. आणि हिरकणीच्या शौर्य कथेने प्रसिध्द बुरुज धैर्य व मातृत्वाचे प्रतिक मानले जाते.

## ❖ निषकर्ष :-

रायगड हा किल्ला महाराष्ट्राच्या इतिहासातील अत्यंत गौरवशाली व प्रेरणादायी वारसा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची रायगडला आपल्या स्वराज्याची राजधानी बनवून 1674 साली येथेच राज्यभिषेक केला त्यामुळे रायगड किल्ला केवळ एक किल्ला नसून तो मराठा स्वराज्याचा स्वप्नाचा, स्वाभिमानाचा व स्वातंत्र्याचा जिवंत प्रतिक आहे. भौगोलिक दृष्टया रायगड किल्ला सह्याद्री पर्वत रांगामध्ये उंच व दुर्गम ठिकाणी बसलेला असून व संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. किल्यावरील महादरवाजा राज्यसभा स्थान जगदिश्वर मंदिर गंगासागर तलाव, छत्रपती शिवाजी समाधी हे स्थळे या काळातील उत्तम स्थापत्य केलेचे आणि नियोजनाचे दर्शन घडवितात. त्या सर्व रचना महाराजाच्या दूरदृष्टीचे व प्रशासन कौशल्याचे प्रतिक आहे. रायगड किल्याचे शैक्षणिक महत्व फार मोठे आहे, तेथून विद्यार्थ्यांना इतिहास भूगोल स्थापत्य शास्त्र युध्दकला, आणि स्वराज्य संकल्पना यांचा अभ्यास करता येतो. तसे रायगड किल्ला आपल्याला शिस्त धैर्य नेतृत्व, देशभक्ती व त्याग यांचे महत्व शिकवतो.

## संदर्भ सूची :-


1. प्रा. शिल्पा कुलकर्णी, महाराष्ट्रातील पर्यटन, डायमंड पब्लिकेशन पूणे. डिसेंबर 2009
2. प्रा. डॉ. प्रज्ञा कामडी, महाराष्ट्रातील किल्ले एक दृष्टीक्षेप, साइज्योती पब्लिकेशन नागपूर 2023.
3. आवळसकर शा. वि. रायगडाची जिवनकथा, पूणे. 1962
4. रामदास र.वा. रायगड दर्शन मुंबई 1959
5. खानेकर प्र.के. साद सह्याद्रीची /भटकती/ किल्याची पूणे 1985
6. अ.रा. कूलकर्णी / ग.ह. खरे मराठ्याचा इतिहास खंड पहिला शिवाजी आणि शिवकालीन कॉन्सनेंटल प्रकाशन 1985
7. Kamlapur J.N. the deccan forts, Bombay 1964

**ISSN: 2348-6449 https://bmb.ac.in/aura/ aurabmb@gmail.com**


8. दिवेकर डॉं. हरीरामचंद्र- छत्रपती शिवाजी महाराज, पूणे विद्यापिठ प्रकाशन पूणे 1975
9. गायकवाड आर.डी. आणि इतर इतिहास लेखन पध्दत व ऐतिहासिक स्मारके यांचा अभ्यास फडके प्रकाशन कोल्पापूर 2000
10. अवळस्कर श.वि. रायगडाची जिवनकथा महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ पूणे 1974.